| महाराष्ट्र पोलीस सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | | पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली जनसंपर्क शाखा<br>P.R.O Office, Gadchiroli<br>**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli<br>**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com |
|---|---|---|

# वार्तापत्र

दिनांक २८/११/२०१९

## बलत्कार करुन जिवे ठार मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीस १० वर्ष सश्रम कारावास तसेच ५,५००/- रुपये दंड

=> जिल्हा प्रमुख सत्र न्यायाधिश, गडचिरोली श्री. स्वप्नील खटी यांचा न्यायनिर्णय

दिनांक ३१ मे २०१९ रोजी फिर्यादी हीचे आई-वडील लग्नकार्यासाठी बाहेर गावी गेले असता आरोपीने फिर्यादी ही एकटीच घरी असल्याचे पाहुन रात्रीचे वेळी तिचेवर जबरदस्ती बलत्कार केला. व याबाबत कोणाला सांगीतल्यास तुला व तुझ्या आई-वडीलांना जिवानीशी ठार मारेण अशी धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीवर वारंवार बलत्कार केल्यामुळे ती गरोदर राहीली. माहे डिसेंबर मध्ये आरोपीस लग्न करण्यास विचारणा केली असता त्याने लग्न करण्यास नकार दिला. फिर्यादी व तिचे नातेवाईकांशी भांडण केला. याबाबत फिर्यादीने पोस्टे अहेरी येथे तक्रार दिल्याने पोस्टे ला अप.क्र. ५२/२०१७ कलम ३७६, ५०६ भादवी प्रमाणे गुन्हा नोंदवुन मपोउपनि लक्ष्मीछाया तांबुसकर यांनी तपास करुन सबळ पुराव्या अंती आरोपी विरुद्ध न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री. स्वप्नील खटी सा०. यांनी साक्ष पुरावा वैद्यकीय अहवाल तसेच सहा. अभियोक्ता श्री. सचिन कुंभारे यांच्या युक्तीवाद ग्राह्य धरुन आज दिनांक २७/११/२०१९ रोजी आरोपी नामे संतोष बाबुराव सडमेक रा. व्यंकटरावपेठा यास दोषी ठरवुन कलम ३७६ भादवी मध्ये १० वर्ष सक्षम करावास व ५,०००/- रुपये दंड तसेच कलम ५०६ भादवी मध्ये १ वर्षाचा कारावास व ५,००/- रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

सदर प्रकरणात कोर्ट पैरवी अधिकारी म्हणुन पोनि/प्रकाश तुनकलवार यांनी कामकाज पाहीले आहे.